# पूजेपूर्वीची वैयक्तिक सिद्धता ( शास्त्रासह )

## अनुक्रमणिका

**( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे ( मुद्दे.) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत. )**


१. देवपूजेसाठी करावयाच्या सिद्धतेचा क्रम २१

२. पूजेपूर्वी करावयाच्या वैयक्तिक सिद्धतेचे महत्त्व २२

२ अ. अन् २ आ. सात्त्विकता वाढणे अन् हिंदु संस्कृतीचे जतन होणे २२

३. पूजेपूर्वी करावयाची वैयक्तिक सिद्धता (तयारी) (केवळ कृती) २३

* स्नान, वस्त्रधारण, केशरचना, अलंकारधारण, आचमन, प्राणायाम, टिळाधारण आणि पूजेच्या वेळी करावयाच्या काही कृती २५

४. पूजेपूर्वी करावयाच्या वैयक्तिक सिद्धतेमागील शास्त्र २७

४ अ. स्नान : स्नान केल्यावर शक्यतो लगेच पूजा चालू करावी २७

४ आ. पूजा करतांना घालावयाच्या वस्त्रांचे स्वरूप अन् त्यांचे माहात्म्य ३०

* कृत्रिम धाग्यांपासून बनवलेली वस्त्रे का वापरू नयेत ? ३४

४ इ. पुरुषांनी परिधान करावयाची वस्त्रे ३६

४ ई. स्त्री आणि पुरुष यांनी परिधान करावयाची वस्त्रे ४२

* पूजा करतांना स्त्रियांनी नऊवारी साडी, तर पुरुषांनी धोतर किंवा सोवळे का नेसावे ? ४२

* पूजेला बसतांना उपवस्त्र का घ्यावे ? ते रेशमी का असावे ? ४६

* पूजाविधी किंवा अन्य धार्मिक प्रसंगी पुरुषांनी उपरणे डाव्या खांद्यावरच का घ्यावे ? ५०

* प्रदक्षिणा घालतांना, नमस्कार, पूजा, हवन अन् जप करतांना आणि गुरु अन् देवता यांचे दर्शन घेतांना गळ्याला वस्त्र न गुडांळण्याचे कारण काय ? ५३

* पुरुषांनी आणि स्त्रियांनी डोके झाकण्यामागील शास्त्र ५६

* पुरुषांनी चपटी आणि दोन्हीकडून टोकदार आणि गडद रंगाची टोपी का घालावी ? ५९

* यजमान पुरुष आणि स्त्री, तसेच पुरोहित यांनी घालावयाच्या
वस्त्रांचे रंग कसे असावेत ? ६२
४ उ. स्त्री आणि पुरुष यांची केशरचना ६४
४ उ १. पुरुषांनी शेंडी ठेवण्याचे महत्त्व काय ? ६४
४ उ २. स्त्रियांनी अंबाडा घालण्याचे महत्त्व काय ? ६५
४ ऊ. पूजेसाठी स्त्रियांनी विविध अलंकार अंगभर परिधान करणे अन्
पुरुषांनी केवळ गळ्यात हार व हातात अंगठी घालणे आवश्यक ६६
४ ए. स्नानानंतर प्राणायाम का करावा ? ६९
४ ऐ. पूजकाने टिळा किंवा भस्म धारण करणे ७०
* पूजेपूर्वी स्वतःला कुंकवाचा टिळा का लावावा ? ७२
* हिंदु धर्माने काळा रंग निषिद्ध मानलेला असतांना टिळा
लावण्यासाठी बुक्का का वापरतात ? ८४
* भस्म नेहमी आडवेच का लावतात ? उभे का लावू नये ? ८८
* हळद, कुंकू, शेंदूर, बुक्का अन् गंध स्वतःला आणि इतरांना
विशिष्ट ठिकाणी का आणि कसे लावावे ? ९२
५. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी केवळ देवपूजा नाही, तर पुढील टप्प्याच्या साधनेची
आवश्यकता असणे ९८
६. देवतांचे विडंबन रोखणे, ही काळानुसार आवश्यक उपासना ! ९९

– ‘पूजेपूर्वीची वैयक्तिक सिद्धता’ याविषयीचे अधिक
सूक्ष्म-स्तरावरील अध्यात्मशास्त्रीय ज्ञान १००

## मनोगत

आपल्या सनातन हिंदु धर्माचे अद्वितीय वैशिष्ट्य म्हणजे, धर्माने मनुष्यजीवनातील प्रत्येक गोष्टीमागे केलेला चैतन्यग्रहणाचा सखोल विचार होय. हिंदु धर्मातील जन्म ते मृत्यूपर्यंतचे विविध संस्कार, धार्मिक कृती, मृत्यूनंतरचे श्राद्धादी विधी इत्यादी ईश्वरप्राप्तीसाठी पूरक आहेत, तर देवपूजा, यज्ञयाग इत्यादी उपासनापद्धती प्रत्यक्ष ईश्वरप्राप्ती करून देणाऱ्या आहेत. देवपूजा ही घरोघरी नित्य आचरणात आणावयाची एक सोपी उपासनापद्धत. देवपूजेतून ईश्वरी चैतन्य सहजतेने ग्रहण होते. येथे

लक्षात घेण्याची एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, पूजेपूर्वी पूजकाची सात्त्विकता जितकी वाढेल, तितकी त्याच्याकडून पूजा मनापासून आणि भावपूर्ण होऊन तो पूजेतून ईश्वरी चैतन्य ग्रहण करण्यास अधिक सक्षम होतो. पूजकाची सात्त्विकता वाढण्यास लाभदायक ठरते त्याची वैयक्तिक सिद्धता !

देवपूजेसाठी सिद्ध होतांना पुरुषाने शर्ट-पँट न घालता सोवळे-उपरणे आणि स्त्रीने सहावारी साडी न नेसता नऊवारी साडी का परिधान करावी, पूजकाने गडद रंगाचे वस्त्र का घालावे, पुरुषाने उपरणे डाव्या खांद्यावर का घ्यावे, स्त्रीने डोक्यावरून पदर का घ्यावा यांसारख्या अनेक प्रश्नांची अध्यात्मशास्त्रीय उत्तरे या ग्रंथातून जाणून घेतल्यास पूजकाच्या वैयक्तिक सिद्धतेचे महत्त्व लक्षात येते. एखाद्या कृतीचे महत्त्व लक्षात घेतले की, ती कृती श्रद्धेने होते आणि अशा श्रद्धायुक्त कृतीचे फळ अधिक मिळते. बऱ्याच जणांना पूजेपूर्वी कुंकू, गंध, शेंदूर, भस्म यांसारखे घटक लावण्याविषयी ठाऊक असते; पण ते नेमक्या कोणत्या ठिकाणी आणि कशा पद्धतीने लावायचे यांविषयी बहुधा ठाऊक नसते. या संदर्भातही प्रस्तूत ग्रंथात शास्त्रासह मार्गदर्शन केले आहे.

अध्यात्मात 'भाव तेथे देव' हे महत्त्वाचे सूत्र आहे. देवपूजेपूर्वीची सिद्धता आणि प्रत्यक्ष देवपूजा यांमुळे भक्तीभाव निर्माण व्हायला साहाय्य होते. मोती पूर्णपणे निर्माण होईपर्यंत शिंपला फार महत्त्वाचा असतो आणि मोती हातात आल्यानंतर शिंपल्याला महत्त्व उरत नाही. त्याप्रमाणे एकदा भाव निर्माण झाला किंवा आध्यात्मिक पातळी वाढली की, पूजेतील कर्मकांड तेवढ्या काटेकोरपणे आचरण्याची आवश्यकता नसते. त्याही पुढच्या टप्प्याला देवपूजा करण्याचीही आवश्यकता नसते; कारण अशा साधकाचे मन नेहमी ईश्वराच्या अनुसंधानातच असते; मात्र अशी स्थिती प्राप्त होईपर्यंत धर्मपालनाचे एक महत्त्वाचे अंग म्हणून देवपूजेपूर्वीची सिद्धता आणि प्रत्यक्ष देवपूजा यांकडे पहायला हवे.

या ग्रंथाच्या वाचनाने पूजकाच्या वैयक्तिक सिद्धतेचे महत्त्व लक्षात येऊन त्यानुसार पूजकाकडून कृती घडो आणि त्याला अधिकाधिक ईश्वरी चैतन्याचा लाभ होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**